नोंदणी क्र. : महा. 14857/2006, लातूर

नोंदणी क्र. : अेफ-14770 (2006), लातूर

नवनिर्मिती बहुउद्देशीय संस्था, लातूर संचालित

संस्कार

ज्युनिअर आय.ए.एस. कॉम्पिटेशन

कार्यालय : डी-16, एम.आय.डी.सी. एरिया, लातूर - 413531.

# ज्युनिअर आय.ए.एस. कॉम्पिटेशन : 2024 - 25

दि. 15/04/2025

## *निकालपत्राबाबत* (RESULTS) दोन शब्द....

## FOR MARATHI / SEMI /ENGLISH MEDIUM

प्रथमतः आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार. आपल्या अनमोल सहकार्य व विश्वासावर यावर्षीही सामाजिक व शैक्षणिक बांधिलकी जपणाऱ्या आपल्या शैक्षणिक उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्याचा निश्चित प्रयत्न केला आहे.

प्रश्नपत्रिकेच्या रचनेपासून ते परीक्षेच्या आयोजनापर्यंत सर्व स्तरावर गोपनियता व परीक्षेचे पावित्र्य राखण्याचा आम्ही १०० टक्के प्रयत्न केला आहे व त्यात आम्ही बहुतांशी यशस्वी झालो आहोत असे म्हणण्यास हरकत नाही. कोणत्याही गुणवंत विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, त्याच्यावर अन्याय होऊ नये, त्याच्या मेहनतीचे फळ त्याला मिळावे याच भावनेने उपक्रमाचे पारदर्शक आयोजन करण्याचा आम्ही पुरेपूर प्रयत्न केला आहे. निकालापर्यंत सर्व बाबींची काळजी घेण्यात आलेली आहे. आपण वर्ष २०२४-२५ ची **Marathi /Semi/ English Medium** ची इयत्ता २ री ते ७ वी वर्गासाठीची अंतिम आदर्श उत्तरसुची Final Answer Key विद्यार्थी / पालक / शिक्षकांच्या अवलोकनार्थ दिली होती. त्या उत्तरसूचीमध्ये बऱ्याच तज्ज्ञ शिक्षक / पालकांकडून / कोचिंग क्लासेस मार्फत जे आक्षेप आम्हाला प्राप्त झालेले होते. त्यातील बहुतांश आक्षेपांचा आम्ही सकारात्मक विचार करुन आवश्यक तो बदल करण्यात आलेले आहेत. तपासणी वेळी एखादी त्रुटी आढळली तर ती आमच्या पातळीवर दुरुस्त करुन त्या उत्तरसूचीप्रमाणे संगणकीय तपासणी करण्यात आलेली आहे. एखादा प्रश्न किंवा पर्याय संदिग्ध किंवा चूकीचा असेल तर त्या प्रश्नांचे गुण सर्व विद्यार्थ्यांना समान देण्यात आलेले आहेत.

आमच्या मार्गदर्शन मंडळाने आवश्यक ती सर्व काळजी घेऊन निकाल वेळेत व १०० टक्के निर्दोष लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. याबावत आपण निश्चिंत असावे.

विद्यार्थ्यांना, पालकांना व शिक्षकांना नम्र विनंती आहे की उत्तरपत्रीकांचे संगणकीय तपासणी केलेली असल्याने निकालामध्ये कोणताही बदल होण्याची शक्यता नाही हा विश्वास ठेवावा. इ. २ री ते ४ थी पर्यंतची मुले लहान असतात ओ.एम.आर. शिटमध्ये उत्तरांचे वर्तुळ बऱ्याच वेळा व्यवस्थित भरलेले नसतात किंवा काही खाडाखोडी केलेल्या असतात यामुळे संगणकीय तपासणीमध्ये तांत्रीक अडचणी येतात. वरील सर्व विवेचनानंतरही जर एखाद्या पालकाला निकालाबाबत काही तक्रारच असेल तर त्यांनी रीचेकींगसाठी रु. ४००/- आमच्या पुढील दिलेल्या खात्यावर (खात्याचा तपशील - A/c Name : Sanskar Prakashan, Latur, Name of Bank : Bank of Maharastra, Latur, Current A/c No.60434758282, IFSC Code - MAHB0000928 वर जमा करुन तशी विनंती दि. 18 April 2025 पर्यंत sanskarprakashanltr@gmail.com या ईमेल वर पाठवावी यानंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही. या उत्तपत्रीकांची आमच्या पातळीवर परत तपासणी करुन संबंधिताला त्याबाबत कळविण्यात येईल. **उत्तरपत्रीकांची कोणतीही छायांकीत प्रत देण्यात येणार नाही** तशी सूचना आपणाकडून भरुन घेण्यात आलेल्या प्रवेश फॉर्म / हॉलतीकीटच्या मागे देण्यात आलेली आहे हे आपण जाणतात. 19 April 2025 रोजी **राज्यस्तरीय गुणवत्ता यादी सह** Results - www.juniorias.in या Website वर जाहीर करण्यात येईल.

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे बालमन हे चिखलाच्या गोळ्यासारखे असते. मातीच्या वस्तू बनवणारा जसा चिखलांच्या गोळ्याला हळूवार हातांनी सुंदर आकार देतो, तितक्याच हळूवारपणे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याला आकार देण्यामध्ये शिक्षक, पालक यांच्यासोबतच आम्हाला खारीचा वाटा मिळाला तरी हा आमचा प्रामाणिक प्रयत्न सार्थकी लागेल

आयोजक
ज्युनिअर आय.ए.एस. कॉम्पिटेशन
लातूर

• ज्युनिअर आय.ए.एस.कॉम्पिटेशन सल्लागार मंडळ •

प्रा. संतोष पोरे
माजी आय.आर.एस.आधिकारी

प्राचार्य मधुकरराव गायकवाड
माजी कुलगुरू स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

प्रा. डॉ.सुरेश पाटील
मूल्यमापन विभाग प्रमुख, य.च.म.म.विद्यापीठ, नाशिक

प्रा. उद्धव कोळपे
निवृत्त उपप्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

श्री. विठ्ठलराव शिंदे
राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक

श्री. किशोर कुलकर्णी
राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक

डॉ. नरेशचंद्र काठोळे
संचालक - मिशन आयएएस, महाराष्ट्र राज्य.